करवसुली मुख्य कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
क्रमांक ठामपा /अति.आ/ कनिवसं/४९
दिनांक :- १०/०६/२००९

**आ दे श**

विषय :- **ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत.**

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना त्यांच्या मालमत्ता करात सवलत देण्याबाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या विचाराधीन होता. ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देण्याबाबतच्या प्रस्तावास मा.महासभेने ठराव क्रमांक 451, दिनांक 16/02/2009 अन्वये मान्यता दिली आहे.

1) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिक वा त्यांची पत्नी हयात असेपर्यत, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांना वा त्यांच्या पत्नीच्या नांवे असलेल्या त्यांच्या राहत्या घराच्या मालमत्ता करातील सामान्य करात 100% सवलत दिनांक 01/04/2009 पासुन देण्यात येत आहे.

2) माजी सैनिकांच्या बिगर निवासी वापरासाठी असलेल्या मालमत्तेवरील मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय असणार नाही.

3) या सवलतीलचा फायदा घेण्यासाठी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिकांनी वा त्यांच्या पत्नी यांना दरवर्षी ह्यात असल्याचा दाखला सादर करावा लागेल.

4) तसेच सदरची सवलत ही फक्त त्यांच्या एकाच राहत्या निवासी घरासाठी लागू असेल. तसेच माजी सैनिक वा त्यांच्या पत्नी यांनी "अन्य कुठल्याही ठिकाणी मालमत्ता करात सवलत घेत नाहीत" असे हमीपत्र सादर करावे लागेल.

5) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील माजी सैनिक वा त्यांच्या पत्नीला मालमत्ता करात सवलत देण्यात येणार असल्याने माजी सैनिकांना "डिस्चार्ज सर्टीफीकेट" तसेच "पेन्शन पेमेंट ऑर्डर" आणि "ओळखपत्र "ही कागदपत्रे महापालिकेकडे सादर करावी लागतील.

6) ज्या माजी सैनिकांना पेन्शन अनुज्ञेय आहे अशाच माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत अनुज्ञेय राहील.

माजी सैनिक वा त्यांच्या पत्नीला दरवर्षी मालमत्ता करातील सामान्य करात 100% सवलत देण्यात येणार आहे. अशी सामान्य करापोटी कमी वसुल होणारी रक्कम मालमत्ता कर विभागाकडे जमा दर्शविण्यासाठी लेखाशिर्ष क्रमांक मालमत्ता करामध्ये रिबेट 0600/910/229002 मधून खर्ची दर्शवून पुस्तकी समायोजन संबंधित सहा.आयुक्त / प्रभाग अधिकारी यांनी करावे व याबाबत एक नोंदवहीमध्ये याची नोंद ठेवावी.

LRGumple.
अतिरिक्त आयुक्त,
ठाणे महानगरपालिका,ठाणे

मा.आयुक्त सो. यांच्या मान्यतेने